पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई CB 18/2026

प्रेस नोट

| गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक १३/०३/२०२६ |
|---|---|

# ‘‘ शेअर मार्केट ट्रेडिंगमध्ये नफा मिळवुन देण्याचे आमिष दाखवुन फसवणुक करणाऱ्या कॉल सेंटरवर आर्थिक गुप्तवार्ता पथक व सायबर पोलीसांची यशस्वी कारवाई’’

.............................................................................................................

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलींद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री.संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.दिपक साकोरे व पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री.सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामधील बोगस कॉल सेंटरचा शोध घेवुन कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत.

आर्थिक गुप्तवार्ता पथकाचे सपोनि सुरज गोरे व कक्ष ०१, गुन्हे शाखेचे पोउपनिरी अभय काकड यांना गुप्तबातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, महापे, नवी मुंबई परिसरात राज्यातील नागरीकांना शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक करुन जास्त नफा मिळविण्याचे आमिष दाखवु फसवुणक करणारे बोगस कॉल सेंटर आहेत.

दिनांक १२/०३/२०२६ रोजी मिळालेल्या बातमीचे अनुषंगाने आर्थिक गुप्तवार्ता पथक व सायबर पोलीस यांची वेगवेगळी तपास पथके तयार करुन रबाळे एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे हद्दीतील ऑफिस क्रमांक २०४, दुसरा माळा, टेक्नॉसिटी, ग्रीन स्केप बिल्डिंग, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई येथे छापा टाकला. DG Share Market Research या नावाने कार्यरत असलेल्या कंपनी मध्ये २२ मुले व मुली संगणकावर तयार केलेल्या व्हॉटसग्रुप वर चॅट तसेच कॉल वर बोलत असल्याचे तसेच तेथील संगणकांची तपासणी केली असता त्यामध्ये Intraday Trading व Equity Stock trading कॉल सेंटरचे कामकाज चालत असल्याचे दिसून आले. कंपनीचे मोबाईल क्रमांकावरून शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक केल्यास जास्त परतावा देण्याचे अश्वासन दिल्याचे तसेच रक्कम स्विकारण्याकरिता पाठविण्यात आलेल्या बँक खात्यांचे डिटेल्स पाठविल्याचे चॅट दिसुन आले. सदर कॉल सेंटरमध्ये नागरिकांची फसवणुक करून स्विकारण्यात येणारी रक्कम ही कंपनीच्या बँक खात्यात तसेच इतर १८ विविध बँक खात्यात पेमेन्ट लिंक पाठवुन त्याद्वारे एकुण १,०२,५८,८१८/— रक्कमेची फसवणुक केल्याचे तपासात निष्पन्न झाले. फसवणुकीची रक्कम वाढण्याची शक्यता आहे. कॉल सेंटरमधुन प्राप्त बँक खात्यांची भारत सरकारच्या गृह मंत्रालयाने विकसीत केलेल्या National Cyber Crime Reporting Portal (NCCRP) पोर्टल वर काही बँक खात्याची तपासणी केली असता संपुर्ण देशातुन ०५ सायबर फसवणुकीच्या तक्रारी नोंद असल्याचे दिसुन आले आहे.

आरोपींविरूध्द सायबर पोलीस ठाणे गु.रजि.नं. १४/२०२६, बीएनएस कलम ३१८(४), ३१९(२), ६१(२) अन्वये गुन्हा दाखल आहे. आरोपी (१) शिवम विनोदकुमार दुबे, वय २९ वर्षे, रा.फ्लॅट नं.३०१,ए विंग, कमल हाईट, अपना सहकारी बॅक जवळ, दिवा (ईस्ट), ठाणे. (२) सुजित मसिचरण वाल्मिकी, वय ३० वर्षे, रा. फ्लॅट नं. ६०२,ए विंग, डेन्टल कॉलेजजवळ, दत्ता नगर रोड, अंबरनाथ (वेस्ट), मुंबई यांना अटक केली. पाहीजे आरोपी सुरज दुबे, रा.कोपरखैरणे, नवी मुंबई यांचा शोध सुरु आहे. अटक आरोपींची

दिनांक १५/०३/२०२६ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर आहे. सदर गुन्हयाचा तपास सायबर पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, श्रीमती प्रेरणा कट्टे व सहा.पोलीस आयुक्त, अ.मा.वा.वि.कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई, अति.कार्य.आर्थिक गुन्हे शाखा, श्री.धर्मपाल बनसोडे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विशाल पाटील (सायबर पोलीस ठाणे), रवींद्र जाधव (आर्थिक गुप्तवार्ता कक्ष), पो.नि./गणेश जाधव, सपोनि/सुरज गोरे, सपोनि/विवेक भोईर, पोउपनिरी/अभय काकड, पोशि/वंजारी व पोशि/येवले यांनी केली आहे.

★★★★★★★★★★

